RNI No. MAHBIL/2009/36619

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग एक–कोकण विभागीय पुरवणी

वर्ष १२, अंक ३२] गुरुवार, मे ७, २०२६/वैशाख १७, शके १९४८ [पृष्ठे ३ , किंमत : रुपये ११.००

असाधारण क्रमांक ४९

प्राधिकृत प्रकाशन

सक्षम प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (भूसंपादन शाखा), वसई यांजकडून

अधिसूचना

भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याच्या आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.

क्रमांक व्हीडी/भूसंपादन/मौजे नागले/कावि ०५/२०२६.—ज्याअर्थी, भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकारद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना महसूल व वन विभाग क्रमांक संकिर्ण ११/२०१४/ प्र.क्र.७७/अ-२, दिनांक १९ जानेवारी २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश उक्त अधिसूचना असा करण्यात आला आहे.) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ खंड (झेड ए) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी एखाद्या जिल्ह्यातील १०,००० हेक्टर पेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरिता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या जिल्ह्याचा जिल्हाधिकाऱ्यांस यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त जमीन" असा करण्यात आला आहे.) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त "सार्वजनिक प्रयोजन" असा करण्यात आला आहे.) आवश्यक आहे, अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे, असे वाटते, ज्याच्या स्वरुपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची दोन मध्ये दिलेले आहे, आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमी संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची तीन मध्ये दिलेली आहेत.

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या अनुसूची चार मध्ये दिलेला आहे ;

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट-कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकांचा तपशील, यासोबत जोडलेल्या अनुसूची पाच मध्ये दिलेला आहे.

त्याअर्थी, आता असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम ४ (अ) नुसार कोणतीही व्यक्ती ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही.

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर सक्षम प्राधिकारीस विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमुद करून अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल.

परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुध्दीपुरस्पर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची सक्षम प्राधिकारीकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (५) अ नुसार सक्षम प्राधिकारी भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्यांचा निर्देश "उक्त नियम" असा करण्यात आला आहे.) यांच्या नियम १० च्या उपनियम (३) द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमि अभिलेखाच्या अद्ययावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पुर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेल्या जिल्हाधिकारी यांनी उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी वसई तालुक्याकरीता उपविभागीय अधिकारी वसई यांस पदनिर्देशित केले आहे.

अनुसूची एक

मौजे नागले, ता. वसई, जि. पालघर येथील संपादित करावयाच्या जमिनीचा तपशील

अ.क्र.	स.नं./हि.नं.	बाधीत अंदाजे क्षेत्र (चौ.मी.)
१	७२	५५५४.७७
२	८७	८७५०.४५
३	८६	६०२१.०५
४	८८	५६३.१४
५	१२/ब	३९.००
६	१२/अ	६३२५.४६
७	३८	९८३४.६४
८	८९	३७२३.२६
९	६२	३०७८.३१
१०	९०	२८६५.३२
११	७३	५१७.४४
	एकूण	**४७२७२.८**
	हेक्टर आर	**४.७२७२**

अनुसूची दोन

सार्वजनिक प्रयोजन स्वरुपात विवरण	
प्रकल्पांचे नाव	मौजे नागले ता. वसई ४० मीटर रुंद गायमुख ते पायेगाव खाडीपूल
प्रकल्पाचे वर्णन	सदरहू रस्ता व खाडीपूल हा ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील भाईदरपाडा येथे असलेल्या घोडबंदर रस्त्यास जोडण्यात येणार आहे.
समाजाला मिळणारे लाभ	मौजे नागले या व परिसरातील गावे उक्त प्रकल्पामुळे ठाणे महानगरपालिका क्षेत्राशी जोडले जाऊन महापालिका क्षेत्रामधील सोईसुविधा लाभ नागरीकांस उपलब्ध होईल. तसेच प्रादेशिक वाहतुकीचे बळकटी करण या प्रकल्पामुळे होणार असल्यामळे सामाजिक उन्नती या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर होण्यास मदत होईल.

अनुसूची तीन

बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे- विस्थापित होत नाहीत कारणे निरंक.

अनुसूची चार

सामाजिक परिणाम निर्धारणांचा सारांश - निरंक

(सामाजिक परिणाम निर्धारण अभ्यास संस्थेव्दारे दिलेल्या माहितीनुसार)

अनुसूची पाच

अ	**प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांचे पदनाम**	उपविभागीय अधिकारी वसई
ब	**प्रशासकाच्या कार्यालयाचा पत्ता**	श्रीप्रस्था, नालासोपरा-विरार लिंक रोड, एच पी पेट्रोल पंपाच्यापुढे, निळेमोरे, नालासोपारा(प) ता. वसई जि. पालघर पिन -४०१२०३
क	**ज्या अधिसुचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे त्या अधिसूचनेचा तपशील**	मा. जिल्हाधिकारी पालघर यांचेकडील पत्र क्र. भुसंपादन/कक्ष-१/टे-१कावि-१३५७/२०२५, दिनांक ०४/०८/२०२५

टीप :–सदर अधिसूचनेद्वारे ज्या जमिनीची सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा आवश्यकता भासण्याचा संभव असल्याचे कलम ११ चे उपकलम (१) खाली अधिसूचित करण्यात आले आहे. त्याबाबत प्रारंभिक अधिसुचनेच्या तारखेपासुन ६० दिवसाच्या आत सक्षम प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी वसई, विभाग वसई यांचे कार्यालयात आक्षेप नोंदविता येईल. तसेच उक्त जमिनीच्या आरखड्याचे निरिक्षण करता येईल.

शेखर घाडगे,
सक्षम प्राधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी वसई.

डॉ. इंदुराणी जाखड़,
जिल्हाधिकारी पालघर.

वसई,
दिनांक : ६ मे २०२६.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.